REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने

प्रा. डॉ. अनिल कांबळे
ल .भा.पा. महिला महाविद्यालय, सोलापूर.

## प्रस्तावना:



भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष पूर्ण झाले आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताने आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्वीकार केला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताचे अर्थव्यवस्था विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला परंतु हे प्रयत्न करत असताना नियोजनकारापुढे आणि देशाच्या नेतृत्वाकडे अनेक प्रकारचे आव्हाने उभी आहेत ही आव्हाने खऱ्या अर्थाने भारताच्या अर्थव्यवस्थेसमोरील आहेत आजही भारताची विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारताचे विकसनशील पण कमी करायचे असेल आणि खऱ्या अर्थाने भारताला विकसित बनवायचे असेल तर भारतासमोरील जे आव्हाने आहेत ती कमी करणे आवश्यक आहे. भारताने सन २०१७ नंतर पंचवार्षिक योजनांचा त्याग केला सन२०१५ मध्ये नियोजन आयोगाच्या ठिकाणी निती आयोगाची स्थापना केली हे सगळं करत असताना आजही भारतामध्ये वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न आहे दारिद्र्याचा प्रश्न आहे .बेरोजगारी आरोग्य शिक्षण भांडवलाची कमतरता महागाई उद्योगांचा अल्पविकास आरोग्याचे प्रश्न पायाभूत सुविधांची कमतरतावाहतूक आणि दळणवळणातील प्रश्न असे अनेक आव्हाने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला अडथळा निर्माण करत आहेत एका बाजूला राष्ट्र श्रीमंत बनवण्याचे प्रयत्न चालू आहेत तर दुसऱ्या बाजूला मात्र राष्ट्रातील नागरिक हे गरीब बनत चालले आहेत आणि म्हणून आर्थिक विषमता आणि वाढती महागाई या दोन प्रमुख समस्या भारताच्या समोर एक आव्हान म्हणून ओव्या टाकल्या आहेत

## संशोधनाची उद्दिष्टे :

- भारताच्या आर्थिक समस्या समजून घेणे.
- भारताच्या सामाजिक समस्या समजून घेणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहेत्यासाठी प्रकाशित ग्रंथ,पुस्तके,मासिके इत्यादीचा वापर करून संकलित माहितीच्या आधारे प्रस्तुत शोध निबंध तयार करण्यात आला आहे

## संशोधनाची गृहीतके:

- भारतात अनेक प्रकारच्या समस्या आहेत .
- भारताच्या विकासासाठी शासकीय प्रयत्न महत्वाचे आहेत .

## भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने

### वाढती लोकसंख्या:

लोकसंख्या च्या बाबतीत जगामध्ये भारताचा दुसरा क्रमांक आहे सन२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी इतकी होती सध्या ती१४० कोटीच्या पुढे असल्याचे सांगण्यात येते करतो वाढणारी लोकसंख्या ही आर्थिक विकासाला अडथळा आहे असे मानले जाते भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो सध्या लोकसंख्या लाभांशाचा फायदाआपल्याला करून घेता आला पाहिजे परंतु दुर्दैवाने एका बाजूला लोकसंख्या वाढ तर दुसऱ्याबाजूला वाढणाऱ्या लोकांना योग्य रोजगाराचा अभाव अशी परिस्थिती भारतात निर्माण झाले आहे

### दारिद्र्य व बेरोजगारी :

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आणखीन एक सर्वात मोठे आव्हान म्हणजे दारिद्र्य आणि बेरोजगारीचे होय खरं तर विकासाच्या प्रक्रियेमध्ये दारिद्र्याने बेरोजगारी कमी होणे आवश्यक असते परंतु भारतामध्ये मात्र पुरुषा प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नसल्याने लोकांच्या हाताला काम नाही आणि लोकांच्या हाताला काम नसल्यामुळे त्यांना उत्पन्न नाही उत्पन्न नसल्याने त्यांना गरिबीत राहावे लागते आणि गरिबीतून त्यांना त्यांच्या जीवनावश्यक गरजा सुद्धा पूर्ण करता येत नाहीत

### दरडोई उत्पन्नात कमतरता :

भारतातील लोकांचे दरडोई उत्पन्न विकसित राष्ट्रातील लोकांच्या तुलनेत फारच कमी आहे नियोजनाच्या माध्यमातून विकासाला सुरुवात केली त्यामुळे काही प्रमाणात राष्ट्राच्या उत्पन्नात वाढ झाली परंतु वाढणाऱ्या उत्पन्नाबरोबरच लोकसंख्या वाढत असल्याने भारतातील लोकांचे दरडोई उत्पन्न म्हणावे त्या प्रमाणात वाढू शकले नाही दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे बचत कमी राहते पचत कमी म्हणून रोज गुंतवणूक कमी आणि गुंतवणूक कमी म्हणून उत्पादन कमी आणि उत्पादन कमी म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात कमी असे दुष्टचक्र भारताच्या बाबतीत दिसून येते

### अल्प कृषी उत्पादन आणि उत्पादकता :

भारत हा कृषिप्रधान देश आहे आजही भारतामध्ये जवळजवळ 58% लोक शेती आणि शेती संबंधित व्यवसायाची चा गुंतलेले आहेत विकसित देशाची तुलना करता भारतीय शेतीचे उत्पादन आणि उत्पादकता फारच कमी असल्याचे दिसून येते भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण जरी होत असला तरी प्रती हेक्टरी उत्पादकता वाढवणे महत्त्वाचे आहे

### भांडवल उभारण्याची समस्या :

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठी समस्या म्हणजे भांडवल उभारण्याची होय मुळातच भारतात दरडोई उत्पन्न कमी असल्याने बचत कमी आहे आणि बचत कमी असल्यामुळे भांडवल निर्मितीचा दर कमी असलेला आपल्याला दिसून येतो कोणत्याही देशाचा आर्थिक विकास त्या देशाच्या भांडवल मब्लकतेवर अवलंबून असतो परंतु भारतात भांडवल उभारणीवर मर्यादा असल्याने विदेशी भांडवलावर देशाचा विकासाचा पाया अवलंबून असे म्हणावे लागेल

## शिक्षण व आरोग्याचा प्रश्न:

सन 2011 च्या जनगणनेनुसार भारतामध्ये जवळजवळ 26 टक्के लोक निरक्षर असल्याचे दिसून आले कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील शिक्षण पद्धतीवर अवलंबून आहे भारतामध्ये सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या कमजोर लोकांना योग्य आणि पुरेशा प्रमाणात शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होत असलेल्या दिसून येत नाही

## तांत्रिक मागासलेपणा :

भारतात तांत्रिक मागासलेपणा दिसून येतो जुनाट तंत्रज्ञानामुळे उत्पादकता वाढत नाही नवीन तंत्रज्ञान खरेदीसाठी भांडवल नाही बौद्धिक क्षमता असून देखील नवीन तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी भारताकडे भांडवल नाही भारतासारख्या कृषी प्रधान देशात आजही जुनाट यंत्र आणि तंत्रज्ञान वापरले जाते जवळजवळ हे सर्वच क्षेत्रांमध्ये अनुभवास मिळते जर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आणि वाढवला तरच विकसितराष्ट्राच्या तुलनेत आपण पुढे जाऊ शकू

## आर्थिक विषमता :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये श्रीमंत अधिक श्रीमंत बनत जातात त्याबरोबरच गरिबांची गरिबी दूर होणे अपेक्षित असते परंतु भारतात मात्र आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात वाढत चाललेले दिसून येते वाढणारीआर्थिक विषमता हे भारताच्या अर्थव्यवस्थेपुढील फार मोठे आव्हान आहे

## प्रादेशिक विषमता :

भारतामध्ये आर्थिक विकास हा सर्व राज्यात सारख्या प्रमाणात होत असलेला दिसून येत नाही काही घटक राज्य आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत पुढे आहेत तर काही घटक राज्य एक आर्थिक विकासामध्ये मागे असलेले दिसून येतात प्रादेशिक विषमतेमुळे राष्ट्राचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होऊ शकत नाही विकासाची फळे काहीच घटक राज्यांना मिळतात तर काही घटक राज्यांना मात्र त्यापासून वंचित राहावे लागते असे असणे म्हणजे राष्ट्राच्या एकात्मतेला आणि विकासाला फार मोठी बाधा आणणारी गोष्ट आहे

## समांतर अर्थव्यवस्था :

अलीकडच्या काळात भारतामध्ये कर चुकवेगिरी भ्रष्टाचार बेकायदेशीर व्यवहार यांचे प्रमाण वाढत चालले आहे यातूनच बेहिशोबी मालमत्ता मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागले आहे जो पैसा राष्ट्राच्या विकासासाठी वापरता येऊ शकतो तो हवाला मार्गे दुसऱ्या देशामध्ये पाठवला जात आहे अनेक उद्योगपतीने बँकांची कर्जमाफी विदेशामध्ये पलायन केले आहे असे होणे म्हणजे भारतात भारतासाठी फारसे समाधानकारक बाब नाही

## तुटीचा व्यापारतोल :

गेल्या 75 वर्षात भारतामधली निर्यात वाढू शकली नाही हे भारतासाठी दुर्दैव आहे आंतरराष्ट्रीय निर्यातीमध्ये भारताचा वाटा अतिशय नगन्य आहे निर्यातक्षम उद्योगांची स्थापना करून भारताचे निर्यात जर वाढविले तर भारताला विदेशी चलन प्राप्त होईल विदेशी चलनाच्या साह्याने विकासासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री खरेदी करणे सोयीचे होईल परंतु भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण सातत्याने जास्त असलेले दिसून येते

**निष्कर्ष :**

वरील सर्व समस्या विचारात घेता भारता पुढे अनेक आव्हाने आहेत. ते सोडविल्या शिवाय भारत विकसित होणार नाही .भारताचे विकसनशील पण कमी करायचे असेल आणि खऱ्या अर्थाने भारताला विकसित बनवायचे असेल तर भारतासमोरील जे आव्हाने आहेत ती कमी करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१ . भारतीय अर्थव्यवस्था : फडके प्रकाशन कोल्हापूर, भोसले ,काटे दामजी .

२ . भारतीय अर्थव्यवस्था : हिमालय प्रकाशन, मिश्रा आणि पुरी

३. भारतीय अर्थव्यवस्था : संतोष दास्ताने